


म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा
दा. क्र. २०७३
BVBK-0402913

२९१८ २८/५/८४
बा.वा.

छोटे जासूस
(बाल कादंबरी)

भाग ३

# गुंडांच्या जाळ्यात – – –

भाग २ वरून पुढे चालू.....

→→→→→→→→→→→→ o ←←←←←←←←←←←←←

....त्या दोघांनी नरेन्द्र आणि वासुदेवची कॉलर पकडून ठेवली होती. त्यांच्या हातांची पकड एवढी जबरदस्त होती की, नरेन्द्र आणि वासुदेवचा गळा आवळल्या गेला होता. तशा अवस्थेत ते दोघे धटिंगण त्यांना समोर ढकलीत होते. त्यांच्या पुढे गोल्डी आणि राहूल, पिस्तौलच्या धाकामुळे पुढे पुढे चालत होते. गोल्डीला तर या अकस्मात आलेल्या संकटातून मार्ग कसा काढावा काही सुचत नव्हतं. राहूल तर पार घाबरून गेला होता. वासुदेव आणि नरेन्द्र तर अक्षरशः थरथरत पुढे पाय टाकीत होते. जरासंही त्यांचं पाऊल रेंगाळलं, की पाठी-मागून ते ढकलल्या जात होते. जराशा वेळानं गोल्डीनं साहस एकवटून त्या दोघांना मोठ्यानं विचारलं,

'आम्हाला कशाला पकडता आहात ? आम्ही काय केलं ?'

'इथं कशासाठी आलात तुम्ही ?' एका धटिंगणानं विचारलं.

'सहज पिकनिकसाठी म्हणून आलो !' गोल्डीनं सांगितलं.

गोल्डीनं असं विचारलं तेव्हा राहूललाही हिंमत आली. तो म्हणाला, 'तिकडे राघूमैनावर जायचं होतं आम्हाला.'

'मग इकडे कशासाठी आलात ?'

छोटे जासूस भाग – ३

प्रकाशन क्र. : ३३

प्रथमावृत्ती : नारळी पौर्णिमा शके १९१५
१ ऑगस्ट १९९३

प्रकाशिका :
सौ. नीता नवनीत देशमुख
सुयोग प्रकाशन
गोपुरी चौक
नागपूर रोड
वर्धा

मुद्रक :
वि. श्या. बनहट्टी
श्रीनिवास मुद्रणालय
सुविचार प्रकाशन इमारत
धनतोली
नागपूर ४४० ०१२

© नवनीत देशमुख, वर्धा

मुखपृष्ठ चित्रकार : नितीन कराडे, वर्धा

मूल्य रु. १०/– फक्त

नरेन्द्रनं कसंबसं सांगितलं, 'डिक दिसला आम्हाला या झाडांवर, म्हणून डिक गोळा करायला आलो.'

चौघेही छोटे जासूस त्या दोघा धटिंगणाशी गयावया करून बोलत होते. वासुदेवनं आपले दोन्ही हात आपल्या गळ्याकडे स्वतःला सोडवत नेले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. धटिंगणानं आपली पकड अधिक जबरदस्त केली. तेव्हा वासुदेव ओरडला,

'सोडा ! सोडा आम्हाला !'

'इथं आलेला कुणी परत जात नाही.'

एवढं त्या गुंडानं म्हटलं खरं. पण त्याच वेळी त्या गुंडांच्या मानेवर एकाच वेळी कसला तरी जबरदस्त प्रहार झाला. त्याबरोबर त्यांच्या हातातलं छोटंसं पिस्तौल खाली जमिनीवर कोसळलं. आणि नरेन्द्र–वासुदेवची कॉलरही मोकळी झाली. हे बघताच गोल्डी आणि राहूलनं त्या खाली पडलेल्या गुंडांच्या अंगावर लाथा बुक्यांचा भडीमार सुरू केला. नरेन्द्रनं तर जवळच पडलेलं बाभळीचं लहानसं खोड उचललं, आणि त्या दोघांना आळीपाळीनं रट्टे द्यायला सुरुवात केली. ते दोघंही ओ ऽ ऽ य ओ ऽ ऽ य करून ओरडत होते. नरेन्द्रचा जोरदार तडाखा बसल्यावर अक्षरशः गुरासारखे ओरडत होते. त्या झाडीमध्ये या छोट्या जासूसांनी मात्र आता धमाल उडवून दिली होती. त्या दोघांकडे तुच्छतेनं पहात गोल्डीनं एकाच्या पेकाटात जोरदार बुटाची लाथ हाणली आणि मोठ्यानं म्हणाला,

'म्हणे, इथं आलेला कुणी परत जात नाही !'

'हाण साल्याला !' राहूलही ओरडला.

काही वेळातच या चार छोटया जासूसांनी त्या दोन धटिंगणांची पार ऐशी तैशी करून ठेवली होती. दोघांच्याही तोंडातून रक्त येत होतं. कपडे फाटून गेले होते. एकाचा तर चांगलाच कपाळमोक्ष झाला होता. असहाय होऊन ते जमिनीवर आडवे तिडवे पडले होते. गोल्डीनं त्यांच्या हातातून खाली पडलेली पिस्तौल उचलली. त्यांच्या डोक्यावर लावीत त्यानं विचारलं, 'कुठे नेत होता आम्हाला ?'

त्या दोघांमध्ये बोलण्याचेही त्राण उरले नव्हते. एकजण कसाबसा बोलला, 'गार्डनमध्ये !'

'खोटं बोलतोस !' असं म्हणत वासुदेवनं आपल्या चामडयाच्या बुटाची लाथ जोरदार हाणली. वासुदेव पुन्हा मारणार होता, तोच गोल्डीनं त्याला हातानंच 'नको मारू' म्हणून खुणावलं. गोल्डीनं पुन्हा विचारलं, 'सांगा कुठे नेत होता आम्हाला ! नाही तर हा बंदुकीचा घोडा दाबतो. तुम्ही मेलात तरी पोलीस आमच्या वाटचाला जाणार नाही. आम्ही लहान पोरं म्हणून सुटून जाऊ.'

त्यातला एकजण म्हणाला, 'तुम्ही आम्हाला ठार केलं तरी चालेल ! तुम्ही जर बॉस पर्यंत पोचलात तर पहिल्यांदा आम्ही तसेही मरणारच आहोत. बॉस आम्हाला जिवंत सोडणार नाही. नंतर तो तुम्हालाही सोडणार नाही.'

'म्हणजे तुम्ही आम्हाला तुमच्या बॉसकडे नेणार होता !'

'होय, पण पकडून.'

'मग बॉस कुठे आहे तुमचा ?'

'गार्डनमध्येच.'

'पुन्हा खोटं !' राहूल म्हणाला.

'नाही खोटं नाही सांगत आम्ही. ती समोर मोठी हवेली दिसते आहे ना, बॉस तिथंच असतो. येथून पंधरा वीस फुटावर गार्डन लागेल. या गार्डनमधून समोर जा. पुढे खाली जमिनी-कडे तळघराच्या दिशेनं उतरत्या पायऱ्या आहेत. तेथून तुम्ही हवेलीत जाऊ शकाल.'

त्या दोघांना उठता येत नव्हतं. त्यातला एकजण तर बेशुद्ध होऊन निपचित पडला होता. गोल्डीनं पिस्तौल आपल्या खिशात ठेवलं आणि आपल्या मित्रांना म्हणाला, 'चला रे !'

त्या दोघाही गुंडांना तिथंच सोडून ते हवेलीच्या दिशेनं निघाले होते. रस्त्यात गोल्डीनं नरेन्द्र आणि वासुदेवला विचा-रलं, 'का रे त्यांच्या हातातून पिस्तौल खाली कशी पडली ?'

'आम्हालाही कळलं नाही.'

'ते एकदमच किंचाळले.'

गोल्डीनं विचार करीत म्हटलं, 'एकाएकी ते किंचाळतील तरी कसे ?'

'मला असं वाटते, मागून कुणी तरी त्या दोघांच्या मानेवर एकाच वेळी प्रहार केला असणार !' राहूलनं आपलं डोकं लढवीत सांगितलं.

नरेन्द्र म्हणाला, 'कुणी जर प्रहार केला असता तर तो आपल्याला दिसला असता ना.'

'आणि एवढ्या लांब या बाभूळवनातच आपल्याला वाचवायला कुणी येईल तरी कसा ?' वासुदेव म्हणाला.

गोल्डीलाही काही समजत नव्हतं. एवढ्या या आडरानात आपल्याला वाचवायला कोण आलं असेल म्हणून ! सर्वांना मात्र एक आनंद वाटत होता, त्या दोघा गुंडांना आपण पार लंबं करून टाकलं याचा.

छोटे जासूस आता गार्डनसमोरच्या लोखंडी फाटकाजवळ उभे होते.

* * *

संध्याकाळ झाली होती.

गोल्डी आणि त्याचे मित्र गार्डनसमोरच्या लोखंडी फाटका–जवळ उभे होते. या गार्डनला एक भलं मोठं लोखंडी फाटक होतं. या फाटकाला अणकुचीदार खिळे वर तोंड करून बसवले होते. आतमध्ये वेगवेगळी फुलझाडं लावलेली होती. मधोमध एक कारंजाचा हौद दिसत होता. ह्या हौदात पाणी होतं. त्यात कमळाची फुलं आणि कमळाची मोठमोठी पानं दिसत होती. कारंजाचं पाणी मात्र उडत नव्हतं. राहूलनं गोल्डीला हळूच दबल्या सुरात विचारलं, 'का रे आतमध्ये कसं जायचं ?'

यावर गोल्डीनं लोखंडी फाटकाला आतल्या बाजूला ढकललं. तसं ते लोखंडी फाटक हळूहळू सरकत आतल्या बाजूला गेलं. त्याबरोबर चौघांनीही आतमध्ये शिरण्याचा पवित्रा घेतला. चौघेही जण आतमध्ये आल्याबरोबर लोखंडी फाटक पूर्ववत पुन्हा लागून गेलं. वासुदेवच्या मनात एकदम शंका आली. तो म्हणाला, 'का रे आपल्याला बाहेर पडायला हे दार उघडेल

किंवा नाही ?'

वासुदेवला आलेली शंका प्रत्येकाच्याच मनात आली होती. पण गोल्डी पुढे चालू लागला होता. म्हणून तिघंही मुकाट्यानं त्याच्या मागोमाग चालू लागले होते.

कारंजा ओलांडून ते पुढे आले. समोर उतरणाऱ्या पायऱ्या दिसल्या. क्षणभर ते तिथेच थबकून उभे राहिले. पायऱ्यांवरुन उतरावं की उतरु नये ह्या संभ्रमात ते होते. गोल्डीला लगेच आठवलं, 'त्या गुंडांनी सांगितलेल्या त्या ह्याच पायऱ्या असाव्यात.'

'चला मग उतरु या खाली.' राहूल म्हणाला.

पायऱ्या उतरण्यासाठी राहूलनं पुढाकार घेतला होता. प्रत्येकालाच भीती वाटत होती. आतमध्ये काय असेल ? कशी माणसं असतील ? पकडल्या गेलो तर आपली सुटका होणंही शक्य नाही. हे सगळं त्यांना ठाऊक होतं. याही वेळी त्यांच्या मनात ही असल्या विचारांची भीती दाटली होतीच. पण ह्या हवेलीचा छडा लावण्याच्या त्यांच्या प्रबळ इच्छेनं भीती दूर सारली होती.

पंचवीस–तीस पायऱ्या उतरुन ते खाली आले. त्यावेळी एका भव्य दालनात ते उभे होते. समोर स्वच्छ प्रकाश सांडला होता. छोटे जासूस त्या भव्य दालनाकडे किती तरी वेळ नुमते बघत राहिले होते.

• • •

रात्र झाली होती.

अद्याप मुलं घरी आली नाहीत म्हणून त्यांचे आईवडील

काळजीत पडले होते. गोल्डीचे वडील आपल्या स्कूटरनं राहूलच्या घरी आले. समोर राहूलची आई होती. तिला त्यांनी विचारलं, 'गोल्डी तुमच्याकडेच आहे ना ?'

राहूलच्या आईनं आश्चर्यचकीत मुद्रेनं त्यांच्याकडे पाहिलं आणि म्हटलं, 'अहो मला वाटत होतं, राहूलच तुमच्या घरी आहे म्हणून.'

'म्हणजे राहूलही घरी नाही ?'

'अहो, सकाळपासूनच घरी नाही. तुमच्याकडे आहे, म्हणून दिवसभर काळजी वाटली नाही. कुठे गेली असतील ही पोरं ?'

आता गोल्डीचे वडीलही विचारात पडले होते.

'नरेन्द्र, वासुदेवच्या घरी असतील !' राहूलच्या आईनं अंदाजानं सांगितलं.

'त्यांचेही आई–वडील आमच्याकडे येऊन गेले. ती पोरंही घरी नाहीत. तेही काळजीत आहेत.'

'काय करावं बाई या पोरांना !' राहूलची आई तर संतापून बोलली.

'बरं देशपांडेसाहेब कुठं आहेत ?'

'ते पण पोलीस स्टेशनलाही नाहीत. घरुन सकाळीच पोलीस स्टेशनला जातो असं सांगून गेले. एक दोनदा तिथं फोनही लावलेत. कुणाला माहितच नाही. मी या दोघा बाप-लेकांची वाट बघून दमून गेले.'

'गेल्या तीन चार दिवसापासून ही पोरं दिवसभर कुठं हुंदडतात काही कळत नाही.'

राहूलची आई म्हणाली, ‘ अहो, आम्हाला वाटत होतं, पोरं तुमच्याकडेच खेळतात म्हणून. ’

‘ आणि आम्ही समजत होतो, तुमच्याकडेच पोरं आहेत.’

राहूलच्या आईनं आणखी एक ठिकाण सुचवलं. ‘ वेदा, नमीताच्या घरी पाह्यलंत का ?’

‘ नाही, त्यांच्या घरी नाही गेलो.’

‘ त्यांची एकता समिती आहे. सगळे बेत तिथंच शिजतात. ते एक काळं कुत्रंही त्यांनी कुठून तरी आणलं बघा.’

‘ आमच्या इथे बांधून ठेवलं आहे ते. गोल्डीची आई सांगत होती, दिवसभर एकसारखं ओरडत होतं ते कुत्र.’

‘ ह्या पोरांच्या सुट्टया असल्या की ते असाच त्रास देतात आईवडिलांना.’ राहूलची आई म्हणाली.

‘ ठीक आहे, मी त्या वेदा, नमीताच्या घरी जाऊन विचारतो.’ असं म्हणत गोल्डीचे वडील राहूलच्या घरातून बाहेर पडले.

* * *

सिद्धार्थ कांबळे !

गोल्डी, राहूल, नरेन्द्र आणि वासुदेवच्या सोबत गेला नव्हता. ज्या रात्री वासुदेवनं त्याला सांगितलं की आम्ही राघूमैना जवळच्या झाडीत खूप लांबपर्यंत गेलो होतो, त्यावेळी मात्र सिद्धार्थ एकदम दचकला. तो थोडासा भित्रा होता पण विचारीही होता. हे चौघे एकटेच त्या झाडीत जाणार. उद्या कशानं काही झालं तर ! ते कुठे जातात हे निदान आपल्याला माहीत आहे. उद्या काही बरं वाईट घडलं तर !

ही मुलं आपला शब्द तर अजिबात ऐकणार नाही. उलट भित्रा म्हणून आपल्यालाच चिडवतात. आपले हे मित्र झाडीकडे जातात, निदान हे कुणाच्या तरी कानावर टाकायला पाहिजे. कुणाला सांगावं यासाठी त्यानं बरंच डोकं खाजवलं होतं.

दुसऱ्या दिवशी अगदी सकाळी सहा वाजताच तो राहूल देशपांडेच्या घरी आला होता. राहूल अद्याप अंथरुणातून उठायचाच असेल ही त्याची कल्पना खरी ठरली होती. कारण बेल दाबल्याबरोबर समोर देशपांडेसाहेबच उभे होते.

'का रे सिद्धार्थ, एवढ्या सकाळी सकाळी आलास ? कुठे पुन्हा ट्रीप वगैरे काढली की काय ? '

'नाही काका. राहूल कुठे आहे ? '

'तो झोपला आहे अजून वर. '

'बरं झालं. मला तुमच्याशीच काम आहे. '

'ये, आतमध्ये तर ये. '

सिद्धार्थ हॉलमधल्या कोचावर येऊन बसला. 'काका, काल आम्ही राघूमैना टेकड्यांवर ट्रीपला गेलो होतो. '

'येथूनच निघाले होते तुम्ही सगळे. काही भांडणं झाली का तिथं ? '

'नाही काका, पण एक भयंकर प्रकार मात्र घडला होता. '

'कुठला रे ? ' देशपांडेंनी आश्चर्यानं विचारलं.

'राघूमैना टेकड्यांच्या बाजूला जी बाभुळीची झाडी आहे ना, त्या झाडीतून बंदूकीच्या गोळ्यांचे आवाज आले होते. '

'राहूलनं तर मला काहीच सांगितलं नाही. '

'मलाही काही सांगू नको अशी शपथ टाकली आहे त्यांनी.'

'त्यांनी म्हणजे कोणी ?'

'राहूल, गोल्डी, नरेंद्र आणि वासुदेवनं. आणि काका ते काल झाडीकडे गेले होते. आणि आजही जाणार आहेत.'

'कशासाठी ?'

'शहरात जे खून होतायेत, त्यांचे धागे दोरे झाडीतच आहेत, असं गोल्डी म्हणाला होता.'

क्षणभर देशपांडेसाहेब विचारमग्न झाले. ज्या फायलीमध्ये आपण तासनतास डोकं खुपसून असतो, त्यांचा साधा एखादाही धागा दोरा आपल्या हाती आला नाही. आणि ही पोरं म्हणताहेत शहरातील खुनाचे धागे दोरे त्या झाडीत आहेत म्हणून ! ते स्वत:शीच विचार करू लागले. आपला राहूल, त्याचा मित्र गोल्डी हे काही बावळट पोरं नाहीत. त्यांच्या बोलण्यात काही तरी तथ्य असलंच पाहिजे. निदान ही पोरं काय करताहेत ते त्यांना करू दिलं पाहिजे. आपण त्यांच्यावर फक्त पाळत ठेवली पाहिजे. नाही तर एखादेवेळी भलत्याच संकटात सापडायची. राहूलचा मित्र सिद्धार्थ आपल्यासमोर बसला आहे, हा विचार मनात येऊन त्यांनी लगेच त्याला म्हटलं,

'सिद्धार्थ, तू हे मला सांगितलंस ते फार चांगलं केलं. तुझ्या मित्रांची काळजी करू नकोस.'

'पण काका, त्यांनी मला टाकलेली शपथ मी मोडली ना.'

'अरे, तू त्यांना वाचवण्यासाठी त्यांच्या भल्यासाठीच शपथ मोडली ना, त्यात मनाला एवढं लावून घेऊ नकोस.

काका, राहूलजवळ यातलं काहीएक बोलू नका. आणि मी इथं येऊन गेल्याचंही त्याला कळू देऊ नका. '

' तू निश्चिंतपणे घरी जा, सिद्धार्थ. मी राहूलजवळ काही एक बोलणार नाही. '

त्या दिवशी सकाळीच देशपांडेसाहेब राहूलच्या आईला ' पोलिसस्टेशनला जात आहे ' असं सांगून पोलिसस्टेशनला आले होते. आल्याबरोबर त्यांनी हवालदार जिरापुरेला सांगितलं, ' हवालदार किशनसिंगला घरून बोलावून आण. '


थोड्याच वेळात हवालदार किशनसिंग पोलीस स्टेशनला हजर झाला होता. त्याच्याकडे बघत देशपांडेसाहेब म्हणाले, ' किशनसिंग, तुम्हाला वेषांतर करून माझ्यासोबत चलायचं आहे. '

किशनसिंगला एवढा हूकूम देण्याचाच अवकाश होता, काही वेळातच पोलिस स्टेशनमध्ये ' अल्लख निरंजन ' असं म्हणत एक साधू लोकांना दिसला होता.

वेषांतर इतकं बेमालूम होतं की पोलिस स्टेशनमध्ये त्याच्या सहकार्यांनी देखील त्याला ओळखलं नव्हतं. देशपांडेसाहेब मात्र गालातल्या गालात हसत होते. पोलिस स्टेशन मधल्या कर्मचाऱ्यांना त्या दिवशी एवढंच दिसलं की देशपांडेसाहेब एका साधूसोबत कुठेतरी मोटर सायकलीनं जात आहेत म्हणून !

मुलं ज्या वेळी बाभूळवनात जाण्यासाठी आली होती, त्यावेळी त्यांना अडवणारा हाच साधू होता. नरेन्द्र आणि वासुदेवला झाडीमध्ये दोन गुंडांनी पकडलं होतं, तेव्हा त्या दोन गुंडांच्या

म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
2098
बा.वा.



तेव्हा त्या गुंडांच्या मानेवर आपल्या दोन हातांनी एकाच वेळी प्रहार करणारे खुद्द इन्स्पेक्टर देशपांडे साहेब होते.

मानेवर आपल्या दोन हातांनी एकाच वेळी प्रहार करणारे खुद्द इन्स्पेक्टर देशपांडेसाहेब होते. मुलांना दिसू नये याची काळजी घेत ते एका बाभळीच्या खोडामागे लगेच लपून बसले होते. त्या दोन्ही गुंडांना ही चार मुलं यथेच्छ बडवत असतांना झाडाच्या खोडामागून देशपांडेसाहेब या मुलांचं साहस मोठ्या कौतुकानं पहात होते.

ज्या वेळी मुलं 'गार्डन' समोर पोचली त्यावेळी साधूबाबा उर्फ किशनसिंग हवालदार आणि इन्स्पेक्टर देशपांडे साहेब झाडाच्या आडोशाला लपून बघत होते. किशनसिंग दबल्या सुरात म्हणाला,

'सर ही पोरं तर आतमध्ये जाताहेत.'

'जाऊ द्या, आपण पाठीमागे आहोतच.'

'पण सर, मला यात धोका वाटतो आहे.'

'कसा काय ?'

'समजा तिथं माणसं जास्त असली तर तुम्ही आणि मी देखील काही करू शकणार नाही.'

'हवालदार तुमच्यापेक्षा ही पोरं बरी ! येणाऱ्या परिस्थितीशी तोंड द्यायला, मानसिक आणि शारीरिक तयारी आहे त्यांची.'

'पण सर...' एवढं म्हणून हवालदारनं मागे पाहिलं. झाडीच्या दिशेनं कुणीतरी 'गार्डन' कडे येतांना दिसत होतं. त्यानं लगेच देशपांडेसाहेबांचं लक्ष तिकडे वेधलं.

देशपांडेसाहेब किशनसिंगला म्हणाले, 'विचार सोडून आता कृती केली पाहिजे, किशनसिंग तू यांच्या समोर उभा रहा मी

मागून प्रहार करतो. एवढं सांगून देशपांडेसाहेब लगतच्या झाडाच्या पाठीमागे लपून राहिले.

* *

पायऱ्या उतरून मुलं जेव्हा खाली आली तेव्हा ती त्या भव्य दालनाकडे बघून अवाक झाली होती. कितीतरी वेळ नुसती बघत उभी राहिली. एवढा अवाढव्य हॉल, त्यांना तो एखाद्या चित्रपट गृहासारखा वाटला. संपूर्ण हॉलमधल्या खालच्या जमिनीवर मऊ लुसलुशीत गालीचा पांधरला होता. दिव्यांच्या झगझगाटानी डोळे दिपल्यासारखं वाटत होतं. वरवर 'गार्डन' म्हणून दिसणाऱ्या या ठिकाणी एवढं मोठं तळघर असेल अशी कल्पनाही कुणाला यायची नाही. त्या हॉलमध्ये वेगवेगळ्या सजावटीच्या विविध वस्तू भिंतीवर, तर कधी खाली स्टॅण्डवर उभ्या करून ठेवल्या होत्या. समोरच्या भिंतीला एक फार मोठे निसर्गचित्र काढून ठेवलं होतं. मुलं ते बघतच राहिले. त्या दालनाचं निरीक्षण करीत ते आता एक एक पाऊल पुढे सरकत होते. चौघेही भीत भीत भिंतीच्या आधारानं एकमेकांचा हात पकडून पुढे पाऊल टाकीत होते.

आता ते समोरच्या दरवाजालगत येऊन पोचले. या दरवाजाला एक लोखंडाचं चक्राकार चक्र बसवलं होतं. गोल्डीनं नकळत ते चक्र उजवीकडे फिरवून पाहिलं. आणि तो दरवाजा क्षणार्धात उघडल्या गेला. या दरवाजातून ते आणखी पुढे सरकले. एखाद्या गॅलरीत आपण उभे आहोत, असं त्यांना वाटलं. तेथून त्यांनी खाली डोकावून पाहिलं. खाली पुन्हा एक भव्य दालन होतं. इथं असंख्य बुरखाधारी माणसं त्यांना दिसली.

2093



सगळयांचे काळया रंगाचे एकसारखे बुरखे होते. प्रत्येकजण एका टेबलाजवळ उभा राहून मुकाटयानं काही तरी काम करीत होता. प्रत्येकाच्या टेबलावर कसली तरी एक लहान मशीन ठेवली होती. कुठल्या तरी पांढऱ्या पदार्थाचे पॅकिंग ते सगळे बुरखाधारी मौन राहून करीत होते.

त्या दालनात असंख्य माणसं असूनही प्रत्येकजण निर्विकार-पणे आपल्या कामात मश्गूल होता. गोल्डी आणि त्याचे मित्र किती तरी वेळ खालच्या बुरखाधारींच्या कामाकडे लक्ष देऊन पहात होते. अर्थात आपण कुणाला दिसू नये याची खबरदारी ते प्रत्येक क्षणाला घेत होते. ते जिथे उभे होते तेथूनच खालच्या हॉलमधे उतरण्यासाठी पायऱ्या होत्या. पुढे जाऊन या पायऱ्यांचे दोन भाग झाले होते. एक भाग सरळ खालच्या हॉलकडे जात होता. तर दुसरा एका दरवाजालगत येत होता. भिंतीचा आधार घेत ही मित्रमंडळी खाली बसत बसत पायऱ्या उतरुन दुसऱ्या भागातल्या दरवाज्याजवळ आली.

ह्या दरवाजाच्या पलीकडे काय आहे हे जाणून घेण्याच्या उद्देशाने गोल्डीने दरवाजा आतल्या बाजूस पुढे ढकलला. समोर पुन्हा मोकळी खोली होती. या खोलीतही दिव्यांचा झगझगाट होताच. हळू हळू आवाज न करता ते या खोलीला ओलांडून पलीकडच्या दालनात आले. येथे असंख्य लाकडी पेटया सील करून ठेवल्या होत्या. काळया कपडयातले दोघेजण सिगारेट ओढीत गप्पा छाटीत बसले होते. त्यांना आपण दिसू नये याची दक्षता मात्र ही जासूस मंडळी घेत होती. गोल्डीनं राहूलचा हात दाबीत दबल्या सुरात हळूच म्हटले, 'या दोघांना क्रॉस

करून आपल्याला पुढच्या खोलीत जायचं आहे.'

'यांना कसा गुंगारा देणार?' राहूलनं विचारलं.

क्षणभर विचार करीत गोल्डी म्हणाला, 'या वाश्याला एक विचित्र आवाज काढता येतो.'

'कसला?'

'आपल्या शाळेच्या नाटकात ह्याने घुबडाचा आवाज काढला होता.'

'अरे हो.'

'या वाशानं तो आवाज इथं काढायचा म्हणतोस?'

'इथं नाही. हे दोघे जिथं उभे आहेत त्यांच्या पाठीमागे बघ काय आहे?'

'ड्रम ठेवले आहेत.'

'हा वाश्या सरपटत सरपटत त्या ड्रमच्या पाठीमागे जाईल. तिथं तो आवाज काढील. ते दोघेही आवाजाचा शोध घेण्यासाठी ड्रमच्या जवळ येतील. तेव्हा आपण हळूच सटकायचं.'

'पण वाश्या राहील ना ड्रमजवळ!'

'आवाज काढल्याबरोबर हा सरपटत पुन्हा आपल्यात येऊन जाईल.'

'ठीक आहे.' असं राहूलनं म्हटलं. आणि वासुदेवला गोल्डीनं सांगितलेला प्लॅन समजावून सागितला. वासुदेव सरपटत सरपटत त्या दोघांच्या मागे मोठाले ड्रम ठेवले होते तिथपर्यंत गेला. तेथूनच एकदा त्यानं या तिघांकडे पाहिलं. गोल्डीनं त्याला आवाज काढण्याचा इशारा केला. त्याबरोबर वासुदेवनं

घुबडाच्या घुत्कारासारखे दोन विचित्र आवाज काढले. तो विचित्र आवाज दालनभर फिरत राहिला. तो लगेच गोल्डी राहूल आणि नरेन्द्र जिथं दबा धरून बसले होते, तिथपर्यंत आला देखील.

इकडे या आवाजानं ते दोघे काळे बुरखाधारी एकदम घाबरून गेले. त्यांनी दचकून इकडे तिकडे नजर फिरवली. आणि पाठीमागे ड्रम ठेवले होते, त्या दिशेनं बघत ड्रमजवळ जाऊ लागले. तेवढ्या अवधीत ह्या चार जासूसांनी अगदी हलक्या पावलांनी ते दालन पार केलं आणि समोर बघितलं......

* * *

वेदानं गोल्डीच्या वडिलांना सांगितलं की, 'आमच्याकडे गोल्डी राहूल यांच्यापैकी कोणीच आलं नाही. परवाला मात्र आम्ही राघूमैनावर गेलो होतो ट्रीपसाठी.'

रात्रीचे दहा वाजून गेले होते. मुलं कुठे गेले असतील ह्या विचारानं सगळ्यांच्या घरी चिंतेचं वातावरण निर्माण झालं होतं. राहूलच्या घरी तर त्याचे वडीलही आले नव्हते. राहून राहून राहूलची आई पोलीस स्टेशनला फोन करून विचारीत होती. प्रत्येक वेळेस 'साहाब अभी आये नही है।' हे एकच उत्तर मिळत होतं. इकडे नरेन्द्र आणि वासुदेवच्या घरी काही वेगळी परिस्थिती होती, अशातला भाग नव्हता. त्या दोघांचेही आई-वडील त्यांना शोधायला बाहेर पडले होते. या चारही जासूसांच्या आयांची मात्र विचित्र अवस्था झाली होती. त्या मुलांना शोधतही होत्या. आणि रडतही होत्या.

आणि तिकडे या छोट्या जासूसांना त्याबद्दल विचार करायला सवड तरी कुठे होती !

* * *

. . . . गोल्डी, राहूल, नरेन्द्र आणि वासुदेवनं ते दालन पार केलं आणि समोर बघितलं.

समोरच्या खोलीत अंधार होता. एका टेबललॅम्पच्या भोवती चार बुरखाधारी माणसं उभी होती. त्यांच्यातला एक जण बाकीच्यांना काही तरी समजावून सांगत होता. या जासूसांनी लगेच दरवाजाचा आश्रय घेतला. दरवाजाच्या आडोशाला खाली बसून त्यांनी समोर सुरू असलेल्या संभाषणाकडे कान दिले.

' . . . . अल्बर्ट, हे काम तुला मोठ्या सावधगिरीनं करायचं आहे. आपल्या नेहमीच्या रस्त्यानं व्हॅन तुला राघूमैना टेकडीच्या पायथ्याजवळ उभी करायची. व्हॅनमध्ये आपला माल असेल. इशारा मिळताच हिरव्या रंगाचा ट्रक व्हॅनच्या समोर येईल. रस्त्यावरून चालता चालता व्हॅन ट्रकच्या आतमध्ये घ्यायची आहे.'

'काही काळजी करू नकोस ! काम झालं असं समज.'

'काम जोखमीचं आहे.'

'कल्पना आहे त्याची मला.'

'आणि एक महत्त्वाचं.'

'काय ?'

'मुंबईवरून एक पार्सल आलं आहे. त्याची विल्हेवाट लावायची आहे.'

'कशी काय ?'

'राघूमैनावरून फेकून द्या, तिकडल्या बाजूनं. बॉस एवढ्यात येणार आहे. तोपर्यंत मुंबईचं पार्सल रवाना झालं पाहिजे.'

हे ऐकून गोल्डी हळूच राहूलला म्हणाला, 'अरे हे लोकं खूप भानगडीचे दिसतात.'

'कशावरून म्हणतोस ?'

'यांच्या बोलण्यावरून तसं वाटते आहे.'

'हो, मलाही शंका येतेय तशी.' वासुदेव म्हणाला.

'मला तर वाटतं, आपण येथून निघायला हवं आता.' राहूलनं म्हटलं.

'हो, येथून निघायला हवं.' नरेन्द्रनंही दुजोरा दिला.

'भुकाही लागल्या आहेत.' राहूलनं सांगितलं.

एवढ्यात त्या खोलीचे दिवे भराभर लागलेत. एक बुरखाधारी म्हणाला, 'चला, बॉस आले आहेत.'

ज्या दरवाज्याच्या पाठीमागे ही जासूस मंडळी लपून बसली होती, त्याच दरवाजाजवळून एक एक बुरखाधारी पुढे निघून जात होता. चौघेही श्वास रोखून त्या दरवाजाच्या पाठीमागे खाली बसले होते. आता कुठल्याही क्षणाला आपण पकडले जाऊ ही भीती त्यांना वाटत होती. त्यांचं नशीब बलवत्तर म्हणून ते अद्यापपर्यंत कोणाच्या नजरेस आले नव्हते. बुरखाधारी ज्या दिशेनं गेले होते, त्या दिशेनं ते चौघेही आता लपत छपत निघाले होते. कधी भिंतीचा आडोसा घेऊन तर कधी एखाद्या दरवाज्याचा आडोसा घेऊन ते पुढे चालत होते.

आता छोटे जासूस एका लहानशा पण अंधारलेल्या खोलीत आले होते. या अंधारलेल्या खोलीतून पलीकडच्या दालनातलं चित्र स्पष्ट दिसत होतं. समोर दिसणारं ते दालन देखील भव्य असंच होतं. दरवाजातून त्या दालनाचा अर्धा भागच दिसत होता. दरवाजाच्या बाहेर डोकावून पहाणं धोक्याचं आहे, हे त्यांच्या लक्षात आल्यामुळे दरवाजाच्या आडोशानेच ते दबकून उभे राहिले.

आणि एकदम त्या खोलीतले सर्व दिवे भराभर लागले. त्यांच्या समोर चार बुरखाधारी उभे होते. त्या चौघांकडे हे चार छोटे जासूस गर्भगळीत नजरेनं बघत होते. चौघांच्याही पायातले त्राण एकाएकी नाहीसे झाले होते. एका बुरखाधारीनं आपली बंदूक काढून या चौघांवर रोखली होती. आता आपण पुरते सापडलो आहोत. येथून पळ काढणंही शक्य नाही. नाही तरी आता यांना सरळ शरण जाण्यापेक्षा थोडासा प्रतिकार करून पाहावा, ह्या विचारानं गोल्डी भिंतीला समांतर हळू हळू एक एक पाय पुढे टाकीत बुरखाधारीच्या अगदी जवळ येऊन उभा राहिला. क्षणभरातच त्यानं बुरखाधारीच्या हातातल्या बंदूकीवर एकदम झेप घेतली. त्याबरोबर तिघेही त्या चार बुरखाधारींच्या अंगावर झेपावले. त्यांना थोडीशीही उसंत न देता चकवून त्या खोलीतून पळ काढला. बुरखाधारी या चार छोटया जासूसांच्या मागे पळू लागले. आणि ह्या छोटयांनी तर त्यांच्याशी खो खो खेळायला सुरुवात केली होती. मधेच एका जाडजूड बुर्खाधारीनं वासुदेवला पकडलं पण वासुदेवनं घुबडाचा विचित्र आवाज काढला त्याबरोबर घाबरुन त्या बुरखाधारीनं पटकन त्याला सोडून दिलं होतं. पुन्हा तो

वासुदेवच्या मागे धावू लागला होता. खरं म्हणजे या बुरखाधारींनी आतापर्यंत कितीतरी लोकांना पाणी पाजलं होतं. पण या बारक्या सशांना पकडणं त्यांना जड जात होतं. त्या चार बुरखाधारीशी लपंडाव खेळता खेळता गोल्डी आणि त्याचे मित्र त्या भव्य दालनात पुन्हा आले.

आता त्यांच्या मागे ते चार बुरखाधारी काहीशा अंतरावर होते. तर समोरुन पुन्हा पाच जण त्यांच्याकडे झेपावत होते. आता आपण पकडल्या जातोय् हा विचार एकाच वेळी चौघांच्याही मनात आला. तेवढ्यात एक धीरगंभीर आवाज त्या दालनात निनादला,

'खबरदार ! जागचा कुणीही हालला तर !'

बुरखाधारी जागच्या जागी उभे राहिले होते.

'हात वर करा.' आवाज गरजला.

त्याबरोबर सर्वांनी हात वर केलेत. तो आवाज मुलांना उद्देशून पुन्हा गरजला, 'मुलांनो इथनं बाहेर निघा. फाटकाजवळ व्हॅन उभी आहे. तिच्यात जाऊन बसा. तुम्हाला ती व्हॅन तुमच्या घरी सोडून देईल.'

गोल्डी, राहूल नरेन्द्र आणि वासुदेव आश्चर्यचकीत होऊन इकडे तिकडे बघत होते. आपल्याला इथंही वाचवायला पुन्हा कोणीतरी आलं. आता अधिक वेळ न घालवता इथनं निघालं पाहिजे या विचारानं ते चौघेही बिनधास्तपणे पायऱ्या चढून वर गार्डनमध्ये आले. गार्डनच्या बाहेर लोखंडी फाटकाजवळ मारोती व्हॅन उभी होती. पळत पळत ते फाटकाजवळ आले.

फाटक बंदच होतं. गोल्डीनं ते आतमध्ये ओढलं आणि समोर उभ्या असलेल्या मारोती व्हॅन मध्ये ते पटापट चढले.

* * *

समोरून येणाऱ्या त्या व्यक्तिला अडवण्यासाठी साधूमहाराज उर्फ किशनसिंग जेव्हा त्याच्या समोर जाऊन उभा राहिला तेव्हा त्याच्या लक्षात आलं की याच्या पाठीमागे सहासात जवान हातात बंदूक घेऊन, आपल्यावरच त्या सर्व बंदूका रोखून उभे आहेत तेव्हा मात्र त्याला आपली चूक कळून आली. तसं पाहता ही चूक किशनसिंगची नव्हती. देशपांडे-साहेबांनीच त्याला समोर जाऊन उभं राहण्याचा पवित्रा घ्यायला सांगितलं होतं. अंधारात त्यांनाही माणसांचा अंदाज घेता आला नव्हता. आता चारपाच टॉर्च एकदम त्याच्यावर प्रकाश रोखून उभे होते

आता आपली काही धडगत नाही हा विचार करून साधू-महाराजांनी भीत भीत कसे तरी शब्द तोंडातून उच्चारले, 'अ ऽ ऽ ल्ला ऽ ऽ ख निरंजन !'

साधूमहाराजांच्या समोर उभ्या असलेल्या त्या दांडगट व्यक्तीने अतिशय खुनशीपणे आपले डोळे फिरवले. आणि साधू-महाराजांना काही कळायच्या आत त्यांच्या चेहऱ्यावरची दाढी ओढून बाजूला फेकून दिली. पाठीमागे हातात टॉर्च आणि बंदूका घेऊन उभ्या असलेल्या आपल्या सोबत्यांकडे बघत तो किंचाळला 'पकडा साल्याला ! आम्हाला बनवतोय् !'

त्याच वेळी इन्स्पेक्टर देशपांडेंनी त्या दांडगटाच्या अंगावर उडी घेतली. त्याबरोबर पाठीमागे असलेले पाचही माणसं या

दोघांवर एकाच वेळी तुटून पडले. गार्डनच्या जवळ रात्रीच्या वेळी वेगळाच धुडगूस सुरू होता. देशपांडे साहेब आपल्या हाताच्या जोरदार ठोशानं एका—एकाला लोळवत होते. पण त्याच वेळी असंख्य हात त्यांच्या अंगावरही कोसळत होते. या धुमाकुळात एवढं बरं झालं होतं की, त्या गुंडांना जवळ असलेली बंदूक चालवायचं भान राहिलं नव्हतं. या गोंधळात किशनसिंगनं त्यांच्या बंदूका हिसकाऊन दूर झाडीत फेकून दिल्या होत्या. हेही एक कारण होतं म्हणा ! आणि स्वत: अंधाराचा फायदा घेऊन सरपटत सरपटत झाडीत निघून गेला होता.

इन्स्पेक्टर देशपांडे मात्र आता जखमी झाले होते. त्या सहा जणांनी देशपांडे साहेबांना बेदम मारलं होतं. चौघांनी त्यांना पकडून ठेवलं. आणि बाकीचे दोघं त्यांना वाटेल तसं मारत सुटले होते. देशपांडेसाहेबांना मारणाऱ्यांपैकी एक जण जण ओरडला,

‘अरे तो दुसरा कुठे आहे ? मूर्खांनो शोधा त्याला.’

दोघं पुन्हा झाडीच्या दिशेनं पळाली. इकडे देशपांडेसाहेबांची शुद्ध हरपली होती.

‘नुरानी व्हॅन इकडे घेऊन ये. याला टाक तिच्यात. नेहमीच्या ठिकाणावर घेऊन जा. आणि ढकलून द्या.’

नूरानीला जोसेफनं आज्ञा दिली खरी पण त्याला गार्डनच्या आतून कसला तरी आवाज ऐकू आला. त्या आवाजाचा वेध घेत तो क्षणभर थांबला. आपल्या सोबत्यांना म्हणाला, ‘मारोती व्हॅनमध्ये याला टाका. आणि व्हॅन सध्याची गार्डनजवळ उभी



जोसेफने आज्ञा केली, ' नूरानी, व्हॅन इकडे घेऊन ये. याला टाका तिच्यात आणि नेहमीच्या ठिकाणावर नेऊन ढकलून द्या. '

करा. मी आतमध्ये जाऊन काय गडबड आहे ते बघून येतो. आणि हो मी सांगेन त्याचवेळी इथनं हलायचं.'

एवढं सांगून जोसेफ आतमध्ये आला होता. समोरचं दृष्य पाहून तो चक्रावून गेला. लहान लहान, चड्डया घातलेले पोरं आपल्या माणसांना चकवताहेत. त्यांचा खोखोचा डाव पाहून तो अधिक चिडला. तो मोठ्यानं बोलला, ' ह्या हरामखोरांना इथं पैसे जास्त मिळतात. दारू मिळते, चरस मिळते, तरी हरामखोर कामं नीट करीत नाहीत.'

गोल्डी आणि त्याच्या मित्रांना वाटलं होतं आपल्याला वाचवायला पुन्हा कोणीतरी आलं. पण तो निनादणारा आवाज जोसेफचा होता. गोल्डी आणि त्याच्या मित्रांना व्हॅनमध्ये बसायला सांगितलं तो जोसेफ होता.

मुलं व्हॅनमध्ये जाऊन बसली. आणि इकडे हातात पिस्तौल घेऊन जोसेफ आपल्या माणसांवर खेकसला, ' नालायकांनो, बुरखे घालून बायका बनला आहात सगळे. चड्डया घालणारे पोरं तुम्हाला पकडता आले नाहीत. लाज वाटायला पाहिजे.'

फाटकाच्या बाहेर उभ्या असलेल्या व्हॅनकडे बघत जोसेफ ओरडला, ' नूरानी, व्हॅन आतमध्ये घेऊन ये.'

● ● ●

(क्रमशः भाग ४ मध्ये......)

2.919 9/4/E४ ०।।.धा
BVBK-0402913

